MHND170000592022

# <u>दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, हिमायतनगर, जि. नांदेड</u>

(पीठासिन अधिकारी श्री. किरण रा. खोंद्रे)

**नियमित दिवाणी दावा क्रमांक १३/२०२२.**
**निशाणी क्रमांक ०६ वर आदेश.**

| | | |
|---|---|---|
| ०१. | गणेश उततमराव जाधव वगैरे. ०१. | **वादी.** |
| | ***विरुध्द*** | |
| ०१. | राजु दिगांबर शिंदे वगैरे ०५. | **प्रतिवादी.** |

**०१.** वादीच्या वतीने प्रस्तुत अर्ज आदेश २६ नियम ९ दिवाणी प्रक्रिया संहिता अन्वये वादमिळकतीची न्यायालयीन आयुक्तांची नेमणुक करुन न्यायालयीन आयुक्ता मार्फत मोजणी करण्यासाठी केला आहे.

**०२.** वादीने प्रस्तुत दावा प्रतिवादी विरुध्द अतिक्रमित जमिनीचा ताबा, व निरंतरची मनाई मिळणे करिता दाखल केला आहे. वादीचे अर्जात असे कथन आहे की, प्रतिवादींनी वादीच्या जमिनीवर किती क्षेत्रात अतिक्रमण केले आहे हे हे निश्चीत करणे करिता दावा मिळकतीची मोजणी करुन हद्दी खुणा कायम करणे आवश्यक झाले आहे. प्रतिवादी यांनी वादीच्या ताब्यातील किती जमिनीवर अतिक्रमण केले हे पाहण्यासाठी वादमिळकतीची मोजणी करणे आवश्यक आहे. 'भुमापन तालुका अभिलेख कार्यालय' यांना आयुक्त

अधिकारी म्हणून नेमणुक करिता वादीने विनंती केली आहे. वादी हे न्यायालयीन आयुक्ताचे शुल्क भरण्यास तयार आहे.

**०३.** प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादींचे विरुध्द एकतर्फा चालविणेचा आदेश पारित करण्यात आला आहे.

**०४.** वादी यांनी मोजणी, प्रतिवादी यांच्या ताब्यातील अतिक्रमित क्षेत्राचा ताबा मिळण्याकरिता व निरंतर ताकिद मिळणे करीता दावा दाखल केला आहे. प्रतिवादी यांनी काही दिवसापासुन अतिक्रमण करणे सुरु केले आहे. दावामिळकतीची मोजणी झाल्या शिवाय वादीच्या मालकी व ताब्यातील जमिनीवर प्रतिवादीने किती अतिक्रमण केले हे निश्चित करता येणार नाही. म्हणून वादीच्या शेतजमिनची मोजणी कामी उप–अधिक्षक भूमि अभिलेख, हिमायतनगर यांची न्यायालयीन आयुक्त म्हणन नियुक्ती करण्यात यावी. तसेच न्यायालयीन आयुक्तानी शेतशेजारी प्रतिवादींना मोजणी बाबत नोटीसा देवून वादीच्या मालकी व ताब्यातील शेतजमिनीची मोजणी करुन त्यांच्या हद्दीच्या निश्चित करण्या करिता न्यायालयीन आयुक्ताची नियुक्ती करण्याची विनंती केली. सबब मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

०१. प्रस्तुत अर्ज मंजुर करण्यात येतो.

०२. तालुका निरिक्षक, भूमि अभिलेख, हिमायतनगर यांची न्यायीक आयुक्त म्हणून नेमणुक करणेत येते.

०३. वादीने न्यायालयीन आयुक्ताचे मोजणी शुल्क नियमा प्रमाणे संबंधील तालुका भुमि अभिलेख कार्यालय, हिमायतनगर येथे जमा करावी.

०४. न्यायालयीन आयुक्त यांनी मौजे सिरपल्ली (ज) ता. हिमायतनगर जि. नांदेड येथील वादीच्या मालकीचे व कब्जेवहिवाटीतील शेत मिळकत गट क्रमांक ९७ मधील वादी क्रमांक ०१ आणी वादी क्रमांक ०२ यांचे प्रत्येकी क्षेत्र ००हे.४५आर या मिळकतीची मोजणी करावी व त्यामध्ये असलेल्या अतिक्रमीत क्षेत्राच्या अचुक नोंदी कराव्यात.

०५. न्यायालयीन आयुक्त यांनी मोजणी करुन नकाशा तयार करावा तसेच नकाशामध्ये कोणत्या लगतच्या प्रतिवादीने वादींच्या मिळकतीत कोणत्या प्रतिवादीने, कोणत्या बाजुने/दिशेने व किती अतिक्रमण केले आहे याचा स्पष्ट उल्लेख नकाशा मध्ये नमुद करावा. मोजणी नकाशा आणी अहवाल या न्यायालयात दाखल करावा.

०६. वादीने सर्व आवश्यक कागदपत्रे न्यायीक आयुक्तांकडे मोजणी पूर्वी जमा करावेत.

KIRAN RAJARAM KHONDRE
Digitally signed by KIRAN RAJARAM KHONDRE
Date: 2023.02.16 17:39:41 +0530

(किरण रा. खोंद्रे)

**हिमायतनगर** दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,

दिनांक :१६ फेब्रुवारी २०२३. **हिमायतनगर**.